# प्रेसनोट

दि. ०५/०७/२०२२

## उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा अधिक संपत्ती बाळगल्या प्रकरणी पुणे महानगरपालिकेतील उप आयुक्त (आकाशचिन्ह विभाग) यांचेवर गुन्हा दाखल

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. १५९/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३(१)(ब)सह १३(२) व भा.द.वि. कलम १०९ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक १) विजय भास्कर लांडगे, वय - ४९ वर्षे, पद - उप आयुक्त (आकाशचिन्ह विभाग) पुणे महानगरपालिका, पुणे<br>२) शुभेच्छा विजय लांडगे, वय - ४३ वर्षे (लोकसेवक यांची पत्नी) |
| परिक्षण कालावधी | दि. २४/०२/२००० ते १९/०२/२०२१ |
| थोडक्यात हकिकत | यातील आरोपी लोकसेवक यांनी वरील नमूद परिक्षण कालावधीमध्ये त्यांचे व त्यांचे पत्नीचे नावे ०१,०२,६०,९९३/- रूपये किंमतीची (उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा अधिक ३१.५९%) अपसंपदा धारण केल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम व भा.द.वि.संहिता कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उप अधीक्षक श्रीमती शितल घोगरे, ला.प्र.वि. पुणे युनिट या तपास करत आहेत.<br>आरोपी लोकसेवक व त्यांचे कुटुंबियांचे नावे पुणे शहरात ४ ठिकाणी व नाशिक जिल्ह्यामध्ये १ अशा ५ ठिकाणी मालमत्ता मिळून आल्या असून त्यांचे राहते घराची व सदर ठिकाणांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून झडतीची (search) प्रकिया सुरू आहे. |

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.